# ‘एमएसएमई’साठी डिजिटल सुविधा

**मुंबई :** सध्याच्या स्पर्धात्मक काळात दैनंदिन कामकाजात डिजिटल सुविधांचा वापर करून सूक्ष्म, लघू आणि मध्यम कंपन्यांही व्यवसायवाढ करत आहेत. त्यासाठी कॅप्टनबिझ या फिनटेक कंपनीने व्यवस्थापन सक्षम करणाऱ्या अनेक उपाययोजना उपलब्ध केल्या आहेत. राज्यातील अनेक ‘एमएसएमई’ कंपन्यांनी या सुविधांचा वापर करून व्यवसायवाढ केली आहे. नवी मुंबईतील राजेश वडाला यांच्या साई एंटरप्रायझेस वाहतूक कंपनीनेदेखील डिजिटल सुविधांच्या मदतीने आपला व्यवसाय एका वाहनावरून १७ वाहनांच्या ताफ्यापर्यंत वाढविण्यात यश मिळवले आहे. कॅप्टनबिझ प्लॅटफॉर्मने इनव्हॉइसिंग, पेमेंट आणि एकूणच व्यवस्थापनासाठी सर्वसमावेशक डिजिटल उपाययोजना दिल्यामुळे वेळ व श्रम वाचविणे शक्य होत आहे.